- प्रेस नोट -

- **<u>पोलीस स्मृतिदिन २१ ऑक्टोबर २०१७</u>** - दि.२१/१०/२०१७

मागील एका वर्षाचे कालावधीत ज्या पोलीस अधिकारी व कर्मचा-यांना आपले कर्तव्य बजावत असताना वीरमरण आले, अशा संपूर्ण भारत देशातील सर्व राज्यामधील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे स्मृतिला आज दि.२१ ऑक्टोबर २०१७ रोजी सकाळी ०८/०० वा.पाषाण रोड स्थित महाराष्ट्र राज्य पोलीस संशोधन केंद्र, पुणे येथील पोलीस हुतात्मा स्मृतिस्थळावर पोलीस दलाच्या वतीने आदरांजली वाहण्यात आली. **<u>२१ ऑक्टोबर हा दिवस देशातील विविध पोलीस दलाचे वतीने पोलीस स्मृतिदिन म्हणून पाळला जातो</u>.**

लडाख येथे दि.२१ ऑक्टो. १९५९ या दिवशी हॉटस्प्रिंग या कडाक्याच्या थंडीच्या ठिकाणी सुसज्ज चिनी सैन्याने केंद्रीय निमलष्करी पोलीस दलाच्या १० शूर शिपायांच्या तुकडीवर पूर्व तयारीनिशी अचानक हल्ला केला. त्यावेळी त्या १० शूर वीरांनी शत्रुशी निकराने लढत देऊन देशासाठी आपले देह धारातिर्थी ठेवले. तेव्हापासून २१ ऑक्टोबर हा दिवस देशातील विविध पोलीस दलाचे वतीने पोलीस स्मृतिदिन म्हणून पाळला जातो. पोलीस स्मृतिदिनाचे दिवशी एकाच वेळी देशातील सर्व पोलीस मुख्यालयाचे ठिकाणी मागील एका वर्षाचे कालावधीत ज्या पोलीस अधिकारी व कर्मचा-यांना आपले कर्तव्य बजावत असताना वीरमरण आले, त्या सर्वांना आदरांजली वाहण्यात येते.

आज पुणे येथे पाषाण गाव रोडवर महाराष्ट्र राज्य पोलीस संशोधन केंद्र,पुणे येथील पोलीस हुतात्मा स्मृति स्मारकावर सकाळी ०८/०० वा. **मा.श्री.विदयाधर गोविंदराव वैदय,(सेवानिवृत्त,संचालक,आसुचना ब्युरो,आय.बी.)** यांनी तसेच मा.रश्मि शुक्ला,पोलीस आयुक्त,पुणे, मा.श्री.संजयकुमार,अपर पोलीस महासंचालक,गुन्हे अन्वेषण विभाग,म. राज्य,पुणे, मा.श्री.भुषणकुमार उपाध्याय,अपर पोलीस महासंचालक व कारागृह महानिरीक्षक व सुधारसेवा म.राज्य,पुणे, मा.रितेशकुमार,अपर पोलीस महासंचालक,बिनतारी संदेश विभाग,पुणे, मा.संजीवकुमार सिंघल,अपर पोलीस महा संचालक,गुन्हे अन्वेषण विभाग,म.राज्य,पुणे, मा.श्री.रविंद्र कदम,सह.पोलीस आयुक्त,पुणे शहर इत्यादी वरिष्ठ अधिकारी यांनी पुष्पचक्र अर्पण केले.

दि.१ सप्टेंबर २०१६ ते ३१ ऑगस्ट २०१७ या कालावधित **<u>महाराष्ट्रातील पोलीस कॉन्स्टेबल,ब.नं.५२१०, सुरेश लिंगा तेलामी</u>** हे पोलीस जवान कर्तव्यावर असताना शहिद झाले.

या प्रसंगी शोक कवायतीचे आयोजन करण्यात आले होते. शोक कवायतीसाठी प्रथमच पुणे शहर पोलीस आयुक्तालया मधील एक महिला प्लाटुनने सहभाग घेतला होता. त्यामध्ये एक पुरूष प्लाटुन असे दोन तुकडया, राज्य राखीव पोलीस दल, पुणे गट क्र.१ व २ यांचेकडील दोन तुकडया, लोहमार्ग व पुणे ग्रामीण पोलीस यांची प्रत्येकी एक तुकडी अशा **एकुण ०६** तुकडयामध्ये पोलीस अधिकारी व कर्मचा-यांनी भाग घेतला. तसेच पुणे शहर, पुणे ग्रामीण, पुणे रेल्वे,एसआरपीएफ बल गट क्र.१ यांचेकडील वाद्य-वृंदयांनी भाग घेतला होता. **परेड कमांडर निलेश मोरे,सहा.पोलीस आयुक्त,स्वारगेट विभाग,पुणे शहर व सेकंट कमांडर महेश साळवी,राखीव पोलीस उप-निरीक्षक,पोलीस मुख्यालय, शिवाजीनगर,पुणे शहर यांनी कवायतीचे नेतृत्व केले.**

१ सप्टेंबर २०१६ ते ३१ ऑगस्ट २०१७ या कालावधीत आपले कर्तव्य बजावित असताना**, वीरगती प्राप्त झालेल्या देशातील पोलीस अधिकारी व पोलीस जवान अशा <u>एकुण ३७९</u>** जवानांच्या नावाच्या यादीचे वाचन शोक कवायतीचे दरम्यान **श्री.राजेंद्र भामरे,सहा.पोलीस आयुक्त,पुणे व श्री.सतिश पाटील,सहा.पोलीस आयुक्त,पुणे शहर** यांनी केले.

या कार्यक्रमासाठी सेवानिवृत्त पोलीस अधिकारी त्यामध्ये (श्री.ए.डी.जोग, श्री.अशोक धिवरे, श्री.ग्यानचंद वर्मा, श्री.सुरेश खोपडे, तसेच पुणे ग्रामीण विभागाचे श्री.सुवेझ हक,पोलीस अधिक्षक,पुणे ग्रामीण,पुणे, पुणे शहर आयुक्तालयातील श्री.साहेबराव पाटील,अपर पोलीस आयुक्त,(प्रशासन),पुणे, श्री.प्रदिप देशपांडे,अपर पोलीस आयुक्त, गुन्हे,पुणे, श्री.शशीकांत शिंदे,अपर पोलीस आयुक्त,(उत्तर प्रादेशिक विभाग),पुणे, श्री.रविंद्र सेनगांवकर,अपर पोलीस आयुक्त,(दक्षिण प्रादेशिक विभाग),पुणे, श्री.पंकज डहाणे,पोलीस उप-आयुक्त,गुन्हे,पुणे, श्री.सुधीर हिरेमठ,पोलीस उप-आयुक्त,(अर्थिक व सायबर),गुन्हे,पुणे, श्री.अशोक मोराळे,पोलीस उप-आयुक्त,वाहतुक शाखा,पुणे तसेच पोलीस उप-आयुक्त परिमंडळ-१,२,३,४ व शहराचे विविध पो स्टे चे हद्दीतील शांतता कमिटी सदस्य व प्रतिष्ठीत नागरीक असे एकुण ७०० ते ८०० जण उपस्थित होते. त्याचप्रमाणे वैद्यकीय अधिकारी श्री.राऊत,पोलीस दवाखाना,शिवाजीनगर,पुणे हे त्यांचे स्टाफसह हजर होते.

सदर कार्यक्रमाचे सूत्र-संचालन सहा.पो.फौज.सिताराम नरके,सेवानिवृत्त एसआरपीएफ ,पुणे यांनी केले.

**टिप :-** पोलीस स्मृतिदिनाचे फोटो https://punepolice.co.in या पुणे पोलीस वेबसाईटवर व प्रसार माध्यमांचे संबंधीत ई-मेलवर पाठवित आहोत.

**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस आयुक्त,कार्यालय,पुणे शहर**